## प्रसिध्दी पत्रक

दिनांक 09/09/2026

**आरोपी लोकसेवक** :- 1) प्रशांत बाळासाहेब पासलकर, पोलीस उपनिरीक्षक (वर्ग 2), नेमणूक मुकुंदवाडी पोलीस स्टेशन, छत्रपती संभाजीनगर 2) सुभाष छगन राठोड, पोलीस अंमलदार (वर्ग 3), नेमणूक मुकुंदवाडी पोलीस स्टेशन, छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांचेकडुन 10000/- रुपये लाचेची मागणी करुन 5000/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने आलोसे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| अ.क्र | शिर्षक | तपशिल |
|---|---|---|
| 1 | घटक | छत्रपती संभाजीनगर |
| 2 | तक्रारदार | महिला, वय 42 वर्षे |
| 3 | आरोपी लोकसेवक | 1) प्रशांत बाळासाहेब पासलकर, वय 41 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पोलीस उपनिरीक्षक (वर्ग 2), नेमणूक मुकुंदवाडी पोलीस स्टेशन, छत्रपती संभाजीनगर.<br>2) सुभाष छगन राठोड, वय 36 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पोलीस अंमलदार (वर्ग 3), नेमणूक मुकुंदवाडी पोलीस स्टेशन, छत्रपती संभाजीनगर. |
| 4 | तक्रार | तक्रारदार व त्यांच्या दोन मुलांवर पोलीस ठाणे मुकुंदवाडी येथे दाखल असलेल्या गुन्ह्यात सदर गुन्ह्याचे तपास अधिकारी PSI पासलकर व त्यांचे मदतनीस पोलीस अंमलदार सुभाष राठोड हे गुन्ह्याच्या तपासात मदत करण्यासाठी तसेच तक्रारदार यांच्या मुलाला जेलमधून सोडविण्यास मदत करण्यासाठी 15,000/- रुपये लाचेची मागणी करीत असले बाबत लेखी तक्रार दिनांक 07/09/2026 रोजी केली. |
| 5 | तक्रारीची पडताळणी | दिनांक 07/09/2026 रोजी दोन्ही आरोपी लोकसेवकांची पोलीस स्टेशन मुकुंदवाडी येथे लाच मागणीची पडताळणी करण्यात आली. पडताळणीदरम्यान आरोपी PSI पासलकर यांच्या समक्ष आरोपी क्रमांक 2 सुभाष राठोड यांनी तक्रारदार यांच्याकडे 10,000/- रुपयांची मागणी करून त्यापैकी 5,000/- रुपये स्वत: स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निषन्न झाले. |
| 6 | सापळा कार्यवाही | दिनांक 08/09/2026 रोजी आयोजित सापळा कारवाईदरम्यान आरोपी क्रमांक 1 यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचासमक्ष दोन्ही हातांची दहा बोटे इशारा करून 10,000/- रुपये मागणी केली. तसेच आरोपी क्रमांक 2 सुभाष राठोड यांनी तक्रारदार यांच्याकडे 10,000/- रुपयांची मागणी करून तडजोडीअंती 5,000/- रुपये स्वीकारण्यास संमती दिली.<br>त्यानुसार आरोपी क्रमांक 2 सुभाष राठोड यांनी तक्रारदार यांच्याकडून 5,000/- रुपये अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम पंचासमक्ष पोलीस स्टेशन मुकुंदवाडीच्या आवारात स्वत: स्वीकारली त्यावेळी त्यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेण्यात आले |
| 7 | गुन्हा रजिस्टर नं./कलम/ पोलीस टाणे/ जिल्हा, दिनांक व वेळ | पोलीस टाणे मुकुंदवाडी येथे गु.र.नं- 498/2026 दिनांक 09-09-2026 रोजी 05.20 वा. भ्र.प्र.अधि.1988 कलम 7 व 12 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| 8 | आरोपी अटक दिनांक व वेळ | दोन्ही आरोपी लोकसेवक यांना दिनांक 09/09/2026 रोजी 06.15 वा. अटक करण्यात आली आहे. |
| 9 | सापळा अधिकारी | संतोष तिगोटे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर.मो. क्र. 9923453888 |
| 10 | तपास अधिकारी | श्री. वाल्मीक कोरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर, मो.क्र. 9623565310. |
| 11 | पर्यवेक्षक अधिकारी | श्री.बाळासाहेब शिंदे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. मो.क्र.9923338565. |
| 12 | सापळा पथक | पो.ह.साईनाथ तोडकर, राजेंद्र सिनकर, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. |
| 13 | मार्गदर्शन | श्रीमती माधुरी केदार-कांगणे, पोलीस अधीक्षक ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर, मो.क्र. 9011092777<br>श्री. शशीकांत सिंगारे, अपर पोलीस अधीक्षक ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर, मो.क्र. 9923102205 |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमुद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.

| | घटक कार्यालय | परिक्षेत्र कार्यालय | ला.प्र वि मुख्यालय |
|---|---|---|---|
| पत्ता | ला.प्र.वि. कार्यालय, जुने तहसिल कार्यालय, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर, 431001 | ला.प्र.वि. कार्यालय, जुने तहसिल कार्यालय, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर, 4310001 | सर पोचखानवाला मार्ग, वरळी मुंबई-400030 |
| दुरध्वनी क्रमांक 1064<br>व्हॉट्सअप क्रमांक | 0240-2344050<br>7720891064 | 0240-2334045 | 022-24921212 |
| ई-मेल आयडी | dysp.acbcsn@mahapolice.gov.in | spacbaurangabad@mahapolice.gov.in | acbwebmail@mahapolice.gov.in |

पोलीस उप अधीक्षक कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

09/09/26

(बाळासाहेब शिंदे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.